मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: 9834138482



# उपसूचनेवरून वाद; नढेंची अंमलबजावणी रोखण्याची मागणी

## मूळ विषयाआड अभियांत्रिकी पदोन्नतीचा मुद्दा घुसवल्याचा आरोप

» पिंपरी | प्रतिनिधी

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या २० एप्रिल रोजी झालेल्या महासभेतील विषय क्रमांक १०, ठराव क्रमांक १९ ला जोडण्यात आलेल्या उपसूचनेवरून वाद निर्माण झाला आहे. मूळ विषयाशी असंबंधित अभियांत्रिकी पदोन्नती आणि सेवाप्रवेश नियमांमध्ये बदल करण्याचा प्रयत्न या उपसूचनेच्या माध्यमातून झाल्याचा आरोप नगरसेवक विनोद नढे यांनी केला आहे. याबाबत नढे यांनी १८ सप्टेंबर रोजी महापालिका आयुक्तांकडे निवेदन देत संबंधित निर्णयाची अंमलबजावणी थांबविण्याची मागणी केली आहे.**




नढे यांच्या म्हणण्यानुसार, महासभेतील मूळ विषय हा सुरक्षा विभागातील रखवालदार अभिषेक फुगे यांना त्यांच्या क्रीडा कामगिरीच्या आधारे ‘सहाय्यक सुरक्षा अधिकारी’ पदावर विशेष पदोन्नती देण्यासंदर्भातील होता. मात्र, या विषयाला जोडलेल्या उपसूचनेत कार्यकारी अभियंता, उपअभियंता आणि सहशहर अभियंता या पदांच्या पदोन्नतीसह सेवाप्रवेश नियमांमध्ये बदल करण्याचे मुद्दे समाविष्ट करण्यात आले. त्यामुळे मूळ विषयाच्या आडून वेगळा विषय मंजूर करण्यात आल्याचा आक्षेप नढे यांनी घेतला आहे.

या उपसूचनेद्वारे अभियांत्रिकी विभागातील पदोन्नतीचा स्वतंत्र विषय मंजूर झाल्याने महासभेच्या कामकाजाच्या पद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण होत असल्याचे नढे यांनी निवेदनात म्हटले आहे. राज्य शासनाने ४ जुलै २०२५ रोजीच्या निर्णयानुसार कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) पदासाठी ७५ टक्के नामनिर्देशन आणि २५ टक्के पदोन्नती असे प्रमाण निश्चित केल्याचा दावा त्यांनी केला आहे. मात्र, महासभेच्या उपसूचनेत हे प्रमाण बदलून २५ टक्के नामनिर्देशन आणि ७५ टक्के पदोन्नती करण्याचा निर्णय घेतल्याचा आक्षेप त्यांनी नोंदविला आहे.

दरम्यान, महापालिकेतील उपसूचनांच्या माध्यमातून मूळ विषयांमध्ये असंबंधित बाबींचा समावेश करून निर्णय घेतले जात असल्यास त्याची प्रशासकीय आणि कायदेशीर तपासणी होणे आवश्यक असल्याचे नढे यांनी आपल्या निवेदनातून अधोरेखित केले आहे. अभियांत्रिकी विभागातील पदोन्नतीच्या निर्णयाची अंमलबजावणी तातडीने थांबवावी, तसेच महाराष्ट्र महापालिका अधिनियमातील कलम ४५१(१) अंतर्गत संबंधित ठराव स्थगित किंवा रद्द करण्यासाठी शासनाकडे अहवाल पाठवावा, अशी मागणी त्यांनी आयुक्तांकडे केली आहे.

### शासनाच्या मान्यतेपूर्वीच अंमलबजावणीचा आरोप

संबंधित ठरावात शासनाची मान्यता मिळण्याची प्रतीक्षा न करता पुढील कार्यवाही करण्यासंदर्भातील मजकूर असल्याचा दावा नढे यांनी केला आहे. शासनाची आवश्यक मान्यता मिळण्यापूर्वीच पदोन्नतीची प्रक्रिया राबविणे हे अधिकारक्षेत्राच्या दृष्टीने प्रश्न निर्माण करणारे ठरू शकते, असे त्यांनी निवेदनात नमूद केले आहे. तसेच काही कर्मचाऱ्यांना ११-११ महिन्यांच्या तदर्थ पदोन्नत्या देण्याच्या उल्लेखावरही त्यांनी आक्षेप घेतला आहे.

### आयुक्तांच्या अधिकारांवर हस्तक्षेपाचा आक्षेप

कर्मचाऱ्यांची पात्रता, सेवाज्येष्ठता, गोपनीय अहवाल तसेच विभागीय पदोन्नती समितीच्या माध्यमातून होणाऱ्या प्रक्रियेत महासभेच्या ठरावातून हस्तक्षेप झाल्याचा आरोप नढे यांनी केला आहे. पदोन्नतीसाठी संबंधित कर्मचाऱ्यांची नावे थेट नमूद केल्याने प्रशासनाच्या नियमित प्रक्रियेवर आणि निष्पक्षतेवर प्रश्न निर्माण होत असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

# मोशीतील वूड्स विले फेज-१मध्ये गणेशोत्सवाची रंगत!

» पिंपरी | प्रतिनिधी

**मोशी, बोऱ्हाडेवाडी येथील वूड्स विले फेज-१ सोसायटीमध्ये दरवर्षीप्रमाणे यंदाही गणेशोत्सव मोठ्या दिमाखात साजरा केला जात आहे. मात्र, यंदाचा गणेशोत्सव एका अनोख्या उपक्रमाने वैशिष्ट्यपूर्ण ठरला असल्याची माहिती सोसायटीचे अध्यक्ष माऊली लांडे यांनी दिली.**



रहिवाशांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा यासाठी बाप्पाच्या चरणी सामाजिक व कौटुंबिक विषयांवर आधारित विविध नाट्यप्रयोगांचे सादरीकरण करण्यात येत आहे. रहिवाशांनी स्वतःच नाटकाचे लेखन करून त्याचे अप्रतिम सादरीकरण केले असून, मोशी-जाधववाडी परिसरात अशा प्रकारचा अभिनव प्रयोग प्रथमच होत असल्याने सोसायटीचे सर्वत्र मोठे कौतुक होत आहे.

या गणेशोत्सवात सोसायटीतील ज्येष्ठ नागरिक संघाच्या वतीने 'अखेर जमलं हो' हे हुंडाबळीसारख्या संवेदनशील विषयावर प्रबोधन करणारे नाटक सादर करण्यात आले. या नाटकात राजूभाई गुजराती, मंगेश उदगीरकर, दिलीप गुजराती, राजेंद्र भोसले, मिलिंद गोखले, सुहास जोशी, विलास मिरकुटे, मंगला मिरकुटे, पल्लवी गुजराती, निरा गोखले आणि संस्कृती पाटील या स्थानिक कलाकारांनी दमदार अभिनय करून उपस्थितांची मने जिंकली. सोसायटीतीलच कलाकारांचे हे सादरीकरण पाहण्यासाठी अबालवृद्धांनी मोठी गर्दी केली होती. सोसायटीचे अध्यक्ष माऊली लांडे यांच्या मार्गदर्शनाखाली सचिव हिरेमठ, खजिनदार थोरात यांच्यासह संचालक मंडळ आणि सांस्कृतिक कमिटीच्या सदस्यांनी यंदाचा गणेशोत्सव यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले आहेत.

# गणेश विसर्जनात डीजेचा दणदणाट; 20 गुन्हे

## सांगवीत सर्वाधिक ९ कारवाया; डीजे साऊंड सिस्टिमसह वाहन जप्त

**पिंपरी | प्रतिनिधी**

**गणेश विसर्जन मिरवणुकीत निर्धारित ध्वनीमर्यादेचे उल्लंघन करत कर्णकर्कश आवाजात डीजे वाजविणे गणेश मंडळे आणि डीजे चालकांना चांगलेच महागात पडले आहे. पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीत सोमवार (दि. २१) झालेल्या सातव्या दिवसाच्या गणेश विसर्जन मिरवणुकांमध्ये ध्वनिप्रदूषण केल्याप्रकरणी सहा पोलिस ठाण्यांत एकूण २० गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. सांगवी पोलिस ठाण्याच्या हद्दीत सर्वाधिक नऊ गुन्हे दाखल झाले असून, विविध कारवायांमध्ये डीजे साऊंड सिस्टिमसह इतर साहित्य जप्त करण्यात आले आहे.**



### सांगवीत वाधिक कारवाई!

सांगवी पोलिस ठाण्याच्या हद्दीत डीजेचा दणदणाट सर्वाधिक झाल्याचे कारवाईच्या आकडेवारीवरून समोर आले. येथे एकाच दिवशी तब्बल नऊ गुन्हे दाखल करण्यात आले. त्याखालोखाल तळेगाव दाभाडे पोलिस ठाण्याच्या हद्दीत पाच गुन्हे दाखल झाले. एमआयडीसी भोसरी आणि शिरगाव-परंदवडी पोलिस ठाण्यांच्या हद्दीत प्रत्येकी दोन, तर तळेगाव एमआयडीसी आणि बावधन येथे प्रत्येकी एक गुन्हा दाखल करण्यात आला.

गणेशोत्सवाला १४ सप्टेंबरपासून सुरुवात झाली. उत्सवाच्या पार्श्वभूमीवर पोलिस आयुक्तालयाकडून सार्वजनिक गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांच्या बैठका घेण्यात आल्या होत्या. गणेशोत्सव उत्साहात साजरा करताना ध्वनिप्रदूषण टाळावे, तसेच निर्धारित ध्वनीमर्यादेचे पालन करावे, अशा स्पष्ट सूचना मंडळांना देण्यात आल्या होत्या. विशेषतः डीजे आणि उच्च क्षमतेच्या ध्वनीक्षेपकांचा कर्णकर्कश आवाज लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि आजारी व्यक्तींसाठी त्रासदायक ठरू शकतो, याचीही जाणीव करून देण्यात आली होती.

पोलिस आयुक्तांच्या सूचनेनुसार परिमंडळीय पोलिस उपायुक्तांनीही त्यांच्या कार्यक्षेत्रातील गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांच्या स्वतंत्र बैठका घेतल्या. गणेशोत्सवासाठी आवश्यक परवानग्या, ध्वनिप्रदूषणाचे नियम, न्यायालयीन निर्देश तसेच नियमांचे उल्लंघन केल्यास होणाऱ्या कायदेशीर कारवाईची माहिती मंडळांना देण्यात आली होती. मात्र, सातव्या दिवसाच्या विसर्जन मिरवणुकीदरम्यान काही मंडळांकडून या सूचनांकडे दुर्लक्ष करण्यात आले.

विसर्जन मिरवणुकीत निर्धारित मर्यादेपेक्षा अधिक आवाजात डीजे आणि ध्वनीक्षेपक यंत्रणा सुरू असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आल्यानंतर संबंधितांवर कारवाई करण्यात आली. डीजे चालक आणि मालकांविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले असून, काही ठिकाणी ध्वनीक्षेपक यंत्रणेसह इतर मुद्देमालही पोलिसांनी जप्त केला.

शिरगाव-परंदवडी पोलिस ठाण्याच्या हद्दीत सातव्या दिवशी ३८ सार्वजनिक गणेश मंडळांच्या मूर्तींचे विसर्जन करण्यात आले. यावेळी चांदखेड येथील जय महाराष्ट्र मित्र मंडळ आणि ओझर्डे येथील शिवतेज मित्र मंडळाच्या विसर्जन मिरवणुकीत निर्धारित ध्वनीमर्यादेपेक्षा अधिक आवाजात ध्वनीक्षेपक यंत्रणा वाजविल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले.

या दोन्ही प्रकरणांत पोलिसांनी गुन्हे दाखल केले. कारवाईदरम्यान डीजे साऊंड सिस्टिम, दोन मिक्सर, दोन ॲम्प्लीफायर आणि एक वाहन पोलिसांनी ताब्यात घेतले. त्यामुळे विसर्जन मिरवणुकीत नियमांचे उल्लंघन करणाऱ्या मंडळे आणि डीजे चालकांवर पोलिसांनी थेट कारवाईचा बडगा उगारल्याचे स्पष्ट झाले आहे.

गणेशोत्सवाच्या काळात उत्सवाचा आनंद कायम ठेवतानाच ध्वनिप्रदूषणाचे नियम पाळण्याचे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे. नियमांचे उल्लंघन झाल्यास संबंधित मंडळे, डीजे चालक आणि मालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

# ड्रेनेज दुरुस्ती धोक्याचा सापळा; नवीन झाकणांसाठी जुन्या तुटलेल्या झाकणांचा अडथळा

**पिंपरी | प्रतिनिधी**

**पावसामुळे खराब झालेल्या ड्रेनेज चेंबरची दुरुस्ती करून नवीन झाकणे बसविण्याचे काम पिंपरी-चिंचवड महापालिकेकडून सुरू आहे. मात्र, दुरुस्तीच्या ठिकाणी नागरिकांच्या सुरक्षेसाठी योग्य बॅरिकेडिंग करण्याऐवजी जुनी आणि तुटलेली ड्रेनेज झाकणेच रस्त्यावर ठेवण्यात आल्याने नव्या समस्येला तोंड फुटले आहे. रस्त्यावर अस्ताव्यस्त पडलेल्या या तुटलेल्या झाकणांमुळे विशेषतः रात्रीच्या वेळी दुचाकीस्वारांना अपघाताचा धोका निर्माण झाला आहे.**



> “सायंकाळनंतर रस्त्यावरची तुटलेली झाकणे दिसत नाहीत. त्यामुळे प्रत्येक दुरुस्तीच्या ठिकाणी रिफ्लेक्टर, बॅरिकेड आणि सूचना फलक असणे गरजेचे आहे. नागरिकांचा अपघात झाल्यानंतर उपाययोजना करण्यापेक्षा दुरुस्ती सुरू असतानाच प्रतिबंधात्मक व्यवस्था करावी.”
> –महेश बाभुळकर, **वाहनचालक**

> “ड्रेनेज चेंबरची दुरुस्ती करताना नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य देण्यात येत आहे. दुरुस्तीच्या ठिकाणी तुटलेली झाकणे किंवा बांधकाम साहित्यामुळे नागरिकांना अडथळा अथवा धोका निर्माण होत असल्यास संबंधित कर्मचाऱ्यांना ते तातडीने हटविण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच आवश्यक ठिकाणी बॅरीकेडिंग व रिफ्लेक्टरची व्यवस्था करण्याबाबत कार्यवाही केली जाईल.”
> –अजय सुर्यवंशी, **सह शहर अभियंता, स्थापत्य विभाग, शहरी दळण वळण**

पावसाळ्यात शहरातील अनेक रस्त्यांवरील ड्रेनेज चेंबरची झाकणे खराब झाली आहेत. पाण्याच्या जोरदार प्रवाहामुळे काही ठिकाणी चेंबरचे बांधकाम खचले, तर काही ठिकाणी झाकणे तुटून रस्त्यावर पडली. परिणामी, वाहनचालक आणि पादचाऱ्यांसाठी ही ठिकाणे धोकादायक बनली आहेत. याची दखल घेत महापालिकेने खराब झालेल्या चेंबरवर नवीन झाकणे बसविण्याचे काम हाती घेतले आहे.

मात्र, नवीन झाकण बसविल्यानंतर त्याभोवती करण्यात आलेले सिमेंटचे काम खराब होऊ नये, यासाठी काही ठिकाणी जुन्या तुटलेल्या झाकणांचाच वापर करण्यात आल्याचे दिसून येत आहे. दुरुस्ती पूर्ण होईपर्यंत वाहनांना त्या भागात जाण्यापासून रोखण्यासाठी बॅरिकेडिंग करणे अपेक्षित असताना, त्याऐवजी तुटलेली झाकणे रस्त्यावर ठेवण्यात आली आहेत.

दिवसा ही तुटलेली झाकणे वाहनचालकांना काही प्रमाणात दिसतात. मात्र, रात्रीच्या वेळी प्रकाशाची कमतरता असल्याने रस्त्यावर पडलेले हे अडथळे सहज लक्षात येत नाहीत. त्यामुळे दुचाकीस्वारांचे वाहन त्यावर आदळून अपघात होण्याची शक्यता आहे. तुटलेल्या झाकणांचे धारदार आणि असमान भागही वाहनचालकांसाठी धोकादायक ठरू शकतात.

दुरुस्तीच्या ठिकाणी नागरिकांचा प्रवेश रोखण्यासाठी योग्य उंचीचे आणि स्पष्टपणे दिसणारे बॅरिकेडिंग करणे आवश्यक आहे. त्यासोबत रात्रीच्या वेळी वाहनचालकांना अडथळा स्पष्ट दिसावा, यासाठी रिफ्लेक्टर किंवा इतर सुरक्षा उपाय करणेही गरजेचे आहे. मात्र, तुटलेली झाकणेच अडथळा म्हणून वापरली जात असतील तर सुरक्षेच्या उपाययोजनेतूनच अपघाताचा धोका वाढण्याची शक्यता आहे.

महापालिकेने ड्रेनेज चेंबरची दुरुस्ती करताना केवळ नवीन झाकण बसविण्यावर भर न देता संबंधित ठिकाणी योग्य बॅरिकेडिंग, रात्रीची दृश्यमानता आणि नागरिकांची सुरक्षितता याकडेही लक्ष देण्याची गरज आहे. दुरुस्तीच्या नावाखाली रस्त्यावर तुटलेली झाकणे आणि भंगार साहित्य पडून राहणार नाही, याचीही खबरदारी घेणे आवश्यक आहे.

# चार वर्षांपासून कमान रखडली; देहू-आळंदी रस्ता कोंडीत!

## काळोखे चौकात बांधकाम साहित्यामुळे रस्ता अरुंद; वाहनचालक त्रस्त!

**पुणे | प्रतिनिधी**

**देहू-आळंदी रस्त्यावरील काळोखे चौकाजवळ सुरू असलेले सुशोभित कमानीचे काम गेल्या चार-पाच वर्षांपासून रखडल्याने नागरिकांचा त्रास वाढला आहे. कमानीच्या बांधकामासाठी लागणारे साहित्य रस्त्याच्या परिसरातच पडून असल्याने वाहतुकीसाठी उपलब्ध जागा कमी झाली आहे. परिणामी सकाळी आणि सायंकाळी गर्दीच्या वेळी या ठिकाणी मोठी वाहतूक कोंडी होत असून, वाहनचालकांना तासन्तास अडकून पडावे लागत आहे.**



देहू-आळंदी रस्ता हा देहूगावातून पिंपरी-चिंचवड, तळवडे, चाकण एमआयडीसी, तळवडे आयटी पार्क तसेच देहू-देहूरोड परिसराकडे जाणाऱ्या वाहनांसाठी महत्त्वाचा मार्ग आहे. त्यामुळे या रस्त्यावर दिवसभर वाहनांची मोठी वर्दळ असते. काळोखे चौकाजवळ पालिका हद्दीच्या सुरुवातीला सुशोभित कमान उभारण्याचे काम सुरू करण्यात आले. मात्र, अनेक वर्षे उलटूनही काम पूर्ण झालेले नसल्याने बांधकामाचा अडथळा कायम आहे.

कमानीच्या कामासाठी रस्त्यालगत ठेवण्यात आलेले बांधकाम साहित्य, यंत्रसामग्री आणि इतर साहित्यामुळे रस्त्याची रुंदी कमी झाली आहे. त्याचा थेट परिणाम वाहतुकीवर होत असून, गर्दीच्या वेळेत वाहनांच्या लांबच लांब रांगा लागत आहेत.

या ठिकाणी वाहतूक कोंडीसोबतच अपघाताचा धोकाही निर्माण झाला आहे. गर्दीच्या वेळेत अतिरिक्त वाहतूक नियंत्रण कर्मचारी आणि मार्गदर्शकांची व्यवस्था करावी, अशीही मागणी करण्यात आली आहे. अनेक वर्षांपासून रखडलेल्या या कामामुळे नागरिकांना दररोज वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत असल्याने प्रशासनाने आता केवळ काम सुरू असल्याचे दाखविण्याऐवजी ते प्रत्यक्षात पूर्ण करण्यासाठी ठोस पावले उचलावीत, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

यावेळी भाजप कामगार आघाडीचे प्रदेश उपाध्यक्ष संभाजी टिळेकर, युवा मोर्चाचे अध्यक्ष अनिरुद्ध काळोखे, किसान आघाडीचे अध्यक्ष रवींद्र काळोखे, उपाध्यक्ष सचिन मराठे, दत्ता हगवणे, ऋतिक मोरे, प्रद्युमन टिळेकर, सचिन काळोखे, रायबा मोरे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### काम पूर्ण होईपर्यंत तात्पुरत्या उपाययोजना करा

कमानीचे काम तातडीने पूर्ण करण्यासाठी संबंधित विभाग आणि ठेकेदाराला आदेश द्यावेत, अशी मागणी महापौर रवी लांडगे यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. काम पूर्ण होईपर्यंत वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी रस्त्याच्या एका बाजूने टप्प्याटप्प्याने काम करावे, तसेच रस्त्यावर पडलेले बांधकाम साहित्य व यंत्रसामग्री तातडीने हटवून वाहतुकीसाठी अधिक जागा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

# इंद्रायणी प्रकल्पाचा जागेवरून पेच; ५७ पैकी १७ हेक्टरच ताब्यात!

**पुणे | प्रतिनिधी**

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या महत्त्वाकांक्षी इंद्रायणी नदी सुधार प्रकल्पाच्या जागेवरून प्रशासन अडचणीत येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. प्रकल्पासाठी आवश्यक असलेल्या ५७ हेक्टरपैकी केवळ १७ हेक्टर जागा महापालिकेच्या ताब्यात असताना, १०० टक्के जागा उपलब्ध असल्याचे शासनाला हमीपत्र देण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. विशेष म्हणजे, संपूर्ण जागा ताब्यात नसतानाही संबंधित ठेकेदाराला वर्कऑर्डर देण्यात आली आहे. त्यामुळे भविष्यात जागेअभावी प्रकल्पाचे काम रखडण्याची शक्यता व्यक्त होत आहे.**



शहराच्या उत्तर सीमेवरील १८.५० किलोमीटर लांबीच्या इंद्रायणी नदीच्या एका बाजूचा हा प्रकल्प महापालिकेकडून राबविण्यात येणार आहे. या प्रकल्पासाठी ४३० कोटी ७५ लाख रुपयांहून अधिक खर्चास स्थायी समितीने १ जुलै २०२६ रोजी मान्यता दिली आहे. केंद्र शासनाच्या अमृत २.० अभियानांतर्गत या प्रकल्पाला मंजुरी मिळाली असून, त्यासाठी आवश्यक जागेबाबत महापालिकेने शासनाला हमी दिली आहे.

तत्कालीन आयुक्त शेखर सिंह यांच्या स्वाक्षरीने शासनाला देण्यात आलेल्या हमीपत्रात प्रकल्पासाठी आवश्यक ३६ लाख १७ हजार चौरस मीटर जागा उपलब्ध असल्याचे नमूद करण्यात आले होते. उर्वरित जागाही विहित वेळेत उपलब्ध करून देण्याची हमी देण्यात आली होती. या हमीच्या आधारे शासनाकडून प्रकल्पाला मंजुरी आणि निधी देण्याची प्रक्रिया पुढे गेली.

मात्र, प्रत्यक्षात महापालिकेच्या ताब्यात केवळ १७ हेक्टर जागा असल्याचे समोर आले आहे. म्हणजेच आवश्यक ५७ हेक्टरपैकी सुमारे ३० टक्केच जागा सध्या ताब्यात आहे. महापालिकेच्या नियमानुसार प्रकल्पासाठी आवश्यक जागेचा मोठा हिस्सा ताब्यात आल्यानंतर काम सुरू करणे अपेक्षित असताना, या प्रकल्पात त्यापूर्वीच ठेकेदाराला वर्कऑर्डर देण्यात आल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित होत आहेत.

ठेकेदाराने प्रकल्पाच्या कामासाठी मातीचे सर्वेक्षण सुरू केले आहे. त्यानंतर प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली जाणार आहे. चिखली आणि डुडुळगाव येथे दोन सांडपाणी प्रक्रिया केंद्रे (एसटीपी) उभारण्यात येणार आहेत. तसेच नदी सुधारणा व इतर कामे ५०० मीटरच्या टप्प्यांत करण्यात येणार आहेत.

मात्र, प्रकल्पासाठी आवश्यक संपूर्ण जमीन अद्याप महापालिकेच्या ताब्यात नसल्याने पुढील टप्प्यांमध्ये जागेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रकल्पाच्या कामाला विलंब होण्याबरोबरच खर्चातही वाढ होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

जमीन ताब्यात घेण्यात होणारा विलंब, विविध विभागांच्या परवानग्या आणि प्रशासकीय अडचणींमुळे यापूर्वी नदी सुधार प्रकल्प रखडल्याची उदाहरणे आहेत. त्यामुळे इंद्रायणी नदी सुधार प्रकल्पाबाबतही अशीच परिस्थिती निर्माण होण्याची भीती व्यक्त होत आहे. महापालिका प्रशासनाने मात्र आवश्यक परवानग्या घेतल्या असून प्रकल्प रखडणार नसल्याचा दावा केला आहे.

प्रकल्पासाठी रेल्वे, राष्ट्रीय महामार्ग, पर्यावरण विभाग, वन विभाग आणि इतर संबंधित विभागांच्या परवानग्या घेणे बंधनकारक आहे. या परवानग्या घेण्यात आल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे. तसेच प्रकल्पाच्या अंमलबजावणीत विलंब, अतिरिक्त कामे किंवा अन्य कारणांमुळे खर्च वाढल्यास वाढीव खर्च महापालिकेकडून केला जाईल, अशी हमीही शासनाला देण्यात आली आहे.

इंद्रायणी नदी सुधार प्रकल्पाचे भूमिपूजन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्याचे नियोजन होते. मात्र, जोरदार पावसामुळे हा कार्यक्रम रद्द झाला. त्यानंतर ८ जुलै रोजी मोशी कचरा डेपोतील इमारत कोसळून नऊ कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला.

### ५०० मीटरच्या टप्प्यांत काम

महापालिकेचे मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे यांच्या माहितीनुसार, प्रकल्पाला स्थायी समितीची मान्यता मिळाल्यानंतर ठेकेदाराला वर्कऑर्डर देण्यात आली आहे. सध्या सर्वेक्षणाचे काम सुरू असून त्यानंतर प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली जाणार आहे. चिखली आणि डुडुळगाव येथे दोन एसटीपी उभारले जाणार असून, नदी सुधारणा व इतर कामे ५०० मीटरच्या टप्प्यांत केली जाणार आहेत.

# गणेश विसर्जनासाठी पुण्यात ट्रॅफिक कोंडीचा ‘फटका’; 10 रस्ते बंद!

## २४ सप्टेंबरच्या रात्रीपासून नो-पार्किंग; जड वाहनांना ४८ तास प्रवेशबंदी

**» पुणे | प्रतिनिधी**

**गणेश विसर्जन मिरवणुकीच्या पार्श्वभूमीवर पुणे शहरातील वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी वाहतूक पोलिसांनी मोठे बदल जाहीर केले आहेत. मुख्य विसर्जन मिरवणुकीदरम्यान शहरातील प्रमुख रस्त्यांवर मोठी गर्दी होण्याची शक्यता असल्याने २४ सप्टेंबर २०२६ रोजी रात्री ११ वाजल्यापासून मिरवणूक संपेपर्यंत १० प्रमुख रस्त्यांवर सर्व प्रकारच्या वाहनांसाठी नो-पार्किंग लागू करण्यात येणार आहे. या कालावधीत संबंधित रस्त्यांवरील नियमित पार्किंग व्यवस्थाही बंद राहणार आहे.**




वाहतूक पोलिसांनी नागरिकांना या रस्त्यांवर वाहने पार्क न करण्याचे आवाहन केले आहे. विसर्जन मिरवणुकीच्या मार्गावर वाहतूक कोंडी होऊ नये तसेच मिरवणूक सुरळीत पार पडावी, यासाठी हे निर्बंध लागू करण्यात आले आहेत.

याशिवाय खंडोजी बाबा चौक ते हॉटेल वैशालीकडे जाणाऱ्या उपरस्त्यांच्या १०० मीटर परिसरातही पार्किंगला बंदी राहणार आहे. त्यामुळे या भागात येणाऱ्या नागरिकांनी आपली वाहने पर्यायी ठिकाणी पार्क करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

गणेश विसर्जन मिरवणुकीच्या पार्श्वभूमीवर पुणे शहरात जड वाहनांच्या वाहतुकीवरही कठोर निर्बंध लागू करण्यात आले आहेत. २५ सप्टेंबर २०२६ रोजी रात्री १२.०१ वाजल्यापासून २६ सप्टेंबर रोजी रात्री १२ वाजेपर्यंत, म्हणजेच तब्बल ४८ तास पुणे शहरात सर्व प्रकारच्या जड वाहनांना प्रवेशबंदी राहणार आहे.

विसर्जन मिरवणुकीच्या काळात रस्त्यांवर वाहनांची मोठी गर्दी होऊ नये, तसेच आपत्कालीन सेवा आणि मिरवणुकीच्या वाहतुकीला अडथळा निर्माण होऊ नये, यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.

मिरवणूक सुरू झाल्यानंतर शहरातील अनेक प्रमुख रस्ते वाहतुकीसाठी बंद करण्यात येणार आहेत. त्यामुळे नागरिकांनी पर्यायी मार्गांचा वापर करावा, असे वाहतूक पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

गणेश विसर्जन मिरवणुकीदरम्यान पुण्याच्या मध्यवर्ती भागात मोठ्या प्रमाणावर गर्दी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांनी शक्यतो मिरवणुकीच्या मार्गावरून प्रवास करणे टाळावे. अत्यावश्यक प्रवास असल्यास पोलिसांनी निश्चित केलेल्या पर्यायी मार्गांचा वापर करावा.

वाहतूक कोंडी टाळण्यासाठी नागरिकांनी प्रतिबंधित रस्त्यांवर वाहने पार्क करू नयेत, वाहतूक पोलिसांच्या सूचनांचे पालन करावे आणि आवश्यकतेनुसार पर्यायी मार्गांचा वापर करावा, असे आवाहन पुणे शहर वाहतूक पोलिसांनी केले आहे. गणेश विसर्जनाच्या दिवशी शहरातील वाहतूक व्यवस्थेवर मोठा ताण येणार असल्याने नागरिकांनी प्रवासाचे नियोजन करूनच घराबाहेर पडणे आवश्यक ठरणार आहे.

### प्रमुख डायव्हर्शन पॉईंट

१. जंगली महाराज रोड – झाशी राणी चौक
२. शिवाजी रोड – काकासाहेब गाडगीळ पुतळा
३. मुदलियार रोड – अपोलो टॉकीज / दारूवाला पूल
४. लक्ष्मी रोड – संत कबीर पोलीस चौकी
५. सोलापूर रोड – सेव्हन लव्हज चौक
६. सातारा रोड – व्होल्गा चौक
७. बाजीराव रोड – सावरकर पुतळा चौक
८. लालबहादूर शास्त्री रोड – सेनादत्त पोलीस चौकी
९. कर्वे रोड – नळस्टॉप
१०. फर्ग्युसन कॉलेज रोड – गुडलक चौक

### १० प्रमुख रस्त्यांवर नो-पार्किंग

१. लक्ष्मी रोड – संत कबीर चौक ते अलका टॉकीज चौक
२. केळकर रोड – बुधवार चौक ते अलका टॉकीज चौक
३. कुमठेकर रोड – शनिपार चौक ते अलका टॉकीज चौक
४. टिळक रोड – जेधे चौक ते अलका टॉकीज चौक
५. बाजीराव रोड – पुरम चौक ते फुटका बुरुज चौक
६. शिवाजी रोड – गाडगीळ पुतळा ते जेधे चौक
७. शास्त्री रोड – सेनादत्त पोलीस चौकी ते अलका टॉकीज चौक
८. जंगली महाराज रोड – झाशी राणी चौक ते खंडोजी बाबा चौक
९. कर्वे रोड – नळस्टॉप ते खंडोजी बाबा चौक
१०. फर्ग्युसन कॉलेज रोड – खंडोजी बाबा चौक ते गुडलक चौक

# पुणे महापालिकेच्या विकासकामांना आचारसंहितेचा ब्रेक!

**» पुणे | प्रतिनिधी**

**पुणे महापालिकेतील विकासकामांना आता निवडणुकीच्या आचारसंहितेचा फटका बसण्याची शक्यता आहे. पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर आचारसंहिता लागू झाली आहे. त्यामुळे महापालिकेतील नव्या विकासकामांचे वर्गीकरण, निधीची तरतूद, निविदा प्रक्रिया, निविदांना मंजुरी तसेच कार्यादेश देण्यासंदर्भातील प्रक्रियेवर निर्बंध येण्याची शक्यता आहे. महापालिकेच्या १५ हजार ६६९ कोटी रुपयांच्या अर्थसंकल्पात विकासकामांसाठी मोठी तरतूद असताना त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी निवडणुकीच्या निर्बंधांमुळे प्रभावित होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.**




राज्यातील पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघांच्या निवडणुकीची तयारी सुरू असून पुणे पदवीधर आणि पुणे शिक्षक मतदारसंघाचाही त्यामध्ये समावेश आहे. महाराष्ट्राच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांच्या संकेतस्थळावर या मतदारसंघांच्या २०२६ मधील निवडणुकीसाठी मतदार याद्या तयार करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती देण्यात आली आहे.

महापालिकेतील सत्ताधारी भाजपकडून विविध प्रभागांमध्ये विकासकामांना गती देण्याचे नियोजन सुरू आहे. नगरसेवकांकडून स्थानिक गरजांनुसार विविध कामांचे प्रस्ताव प्रशासनाकडे पाठविले जात आहेत. रस्ते, पावसाळी गटारे, ड्रेनेज, पाणीपुरवठा, कचरा व्यवस्थापन, उद्याने आणि अन्य पायाभूत सुविधांच्या कामांचा यामध्ये समावेश आहे.

अनेक कामांचे वर्गीकरण आणि प्रशासकीय प्रक्रिया अद्याप सुरू आहे. कोणत्या प्रभागात कोणती कामे प्राधान्याने घ्यायची, त्यासाठी किती निधी लागणार, निविदा कधी काढायच्या आणि कामांना कार्यादेश कधी द्यायचा, याचे नियोजन केले जात असतानाच आचारसंहिता लागू झाली आहे. त्यामुळे या संपूर्ण प्रक्रियेच्या वेळापत्रकावर परिणाम होण्याची शक्यता आहे.

महापालिका प्रशासनाकडून विविध विकासकामांची पूर्वगणनापत्रके तयार केली जात आहेत. पुढील काळात क्षेत्रीय कार्यालयांच्या माध्यमातून अनेक कामांच्या निविदा काढण्याचे नियोजन होते. मात्र, आचारसंहितेच्या कालावधीत नवीन कामांबाबत कोणती प्रक्रिया करता येईल, यासाठी निवडणूक यंत्रणेच्या निर्देशांचे पालन करावे लागणार आहे.

नवीन कामांना आर्थिक मंजुरी देणे, निधीचे फेरनियोजन करणे, निविदांना मान्यता देणे किंवा नव्या कामांना कार्यादेश देणे याबाबत संबंधित नियम आणि निवडणूक यंत्रणेच्या परवानगीची आवश्यकता भासू शकते.

परिणामी, मंजुरीच्या विविध टप्प्यांवर असलेल्या कामांना प्रतीक्षा करावी लागू शकते. महापालिकेच्या स्थायी समितीमार्फत होणाऱ्या आर्थिक निर्णयांवरही आचारसंहितेचा परिणाम होण्याची शक्यता आहे. प्रभागनिहाय कामांचे वर्गीकरण, नव्या कामांसाठी निधीची तरतूद, निधीचे फेरनियोजन, निविदांना मंजुरी आणि विविध विकास प्रकल्पांसाठी आर्थिक तरतूद करण्याचे निर्णय याबाबत निर्बंध लागू झाल्यास अनेक प्रस्ताव पुढे ढकलले जाऊ शकतात.

त्यामुळे महापालिकेतील सत्ताधाऱ्यांनी आखलेल्या प्रभागनिहाय विकासकामांच्या अंमलबजावणीचे वेळापत्रक बदलण्याची शक्यता आहे. विशेषतः निवडणुकीपूर्वी प्रत्यक्ष कामांना सुरुवात करण्याचे नियोजन असलेल्या प्रस्तावांना आचारसंहितेमुळे विलंब होऊ शकतो.